जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २४ दिनांक - १२/०१/२०२५**

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

# एम पी डी ए मधील फरार आरोपी इसमास लोणावळ्यातुन केले जेरबंद

इसम नामे अभिजीत उर्फ चोख्या तुकाराम येळवंडे, वय २४ वर्षे, रा. जाधव चाळ, काकडे पॅलेस समोर, कर्वेनगर, पुणे याने दि. ०५/०६/२०२१ रोजी रविंद्र तागुंदे याचे वर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गोळीबार करुन हल्ला केला होता. त्याचे सोबत सदर गुन्ह्यामध्ये ३ सह आरोपी सामील होते.सदर गुन्ह्या मध्ये त्यास दि.०६/०६/२०२१ रोजी अटक करण्यात येवुन मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्यात आली होती.

सदर गुन्ह्यामध्ये तो येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे बंदिस्त होता.त्या नंतर दि.२१/११/२०२३ रोजी तो जामीनावर बाहेर आला होता.जामीनावर बाहेर आल्या नंतर त्याचेवर वारजे माळवाडी पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.कलम ३२३,५०४ अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल झाल्याने वारजे माळवाडी पोलीस ठाणे कडील पोलीस उपनिरीक्षक साळुंखे, पोलीस अंमलदार खिलारी व तळेकर यांनी अभ्यासपुर्ण असा प्रस्ताव बनवुन'तो धोकादायक व्यक्ती बनला असुन, त्याचे धोकादायक हालचालींमुळे कर्वेनगर परीसरात शांततेत चाललेल्या जन जीवनास वारंवार अडथळे निर्माण होत असल्याबाबत मा. पोलीस उप-आयुक्त, परि- ३, पुणे शहर यांचेकडे तडीपार प्रस्ताव सादर केला होता.त्यावरुन मा. पोलीस उप-आयुक्त, परि- ३, पुणे शहर श्री संभाजी कदम यांनी दि. २८/०८/२०२४ रोजी त्यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१)(अ)(ब) अन्वये पुणे जिल्ह्यातुन ०२ वर्षाकरीता त्यास तडीपार केले होते.तडीपार कालावधित सुध्दा त्याने विनापरवाना पुणे शहरात प्रवेश केल्याने त्याचे विरुद्ध वारजे माळवाडी येथे भा.न्या.सं.कलम ३५२,३५१(१), आर्म ॲक्ट ४(२५), मपोका कलम १४२, ३७(१)(३) सह १३५, क्रि.लॉ.अं.का.कलम ७ अन्वये गुन्हा झाल्याने.त्यास स्थानबध्दकरणे बाबत प्रस्ताव तयार करून तो मा.पोलीस आयुक्त पुणे यांचेकडे सादर केला होता.त्यावरुन मा. पोलीस आयुक्त पुणे शहर श्री. अमितेशकुमार यांनी त्यास दि. ०४/१२/२०२४ रोजी पासुन एक वर्षाकरीता नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द करण्याबाबत आदेशित केले होते. परंतु तेंव्हा पासुन ते आजतागायत सदरचा आरोपी हा नजरे आड झाला होता व गुन्हे शाखेच्या व वारजे माळवाडी पोलीस स्टेशनच्या तावडीत सापडू नये यासाठी पुरेपुर दक्षता घेत होता.मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर पुणे शहर श्री. प्रविण पाटील व पोलीस उप-आयुक्त परि-३ पुणे श्री. संभाजी कदम यांनी वारजे माळवाडी पोलीस स्टेशनच्या भेटी दरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विश्वजित काईंगडे यांना सदर आरोपीला लवकरात ताब्यात घेण्यासाठी निर्देश दिलेले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विश्वजित काईंगडे यांनी पोलीस उप निरीक्षक संजय नरळे यांचे नेतृत्वात एक पथक तयार करुन अभिजीत उर्फ चोख्या तुकाराम

येळवंडे याच्या हालचालीं विषयी त्यांचेशी चर्चा करुन त्याला ताब्यात घेण्या करीता काय पाऊले उचलता येतील याची योजना तयार केली.त्यानंतर मिळालेल्या गोपणीय माहीतीनुसार तो लोणावळा व परिसरात ठिकाणे बदलुन राहत असल्याची माहीती मिळाली असता वारजे माळवाडी पोलीस ठाणे कडील तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक संजय नरळे, पोलीस अंमलदार योगेश वाघ, शरद पोळ असे लोणावळ्यात जावुन त्यांनी दि. ०९/०१/२०२५ रोजीच्या रात्रभर व दुस-या दिवशी पुर्ण दिवसभर त्याचा त्या परिसरात शोध घेवुन अत्यंत चतुराई ने त्याला तेथुन ताब्यात घेतले व पुढील कारवाईसाठी नाशिक कारागृहात पाठविले.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री प्रविण पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि ३,पुणे श्री संभाजी कदम मा.सहा. पोलीस आयुक्त कोथरुड विभाग,श्री भाऊसाहेब पठारे. वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजित काईंगडे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री निलेश बडाख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे,पोलीस उपनिरीक्षक साळुंखे,पोलीस अंमलदार योगेश वाघ, शरद पोळ, सागर कुंभार, प्रशांत चव्हाण, रियाज शेख, विजय खिलारी व किरण तळेकर यांनी केली

